Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ । वर्ष १ । अंक २१ । पाने २।

DIGITAL EDITION

अयोध्येतील राम मंदिरात 'एसी' वेटिंग रूम आणि खास सुविधा (पान २ वर)



"युपीच्या आखाड्यात आठवलेंच्या

# 'आरपीआय'चा 'जय भीम - जय भारत' नारा!

## आठवलेंची 'आरपीआय' उत्तर प्रदेश विधानसभा निवडणूक लढवणार; २५ जागांची मागणी!

जन सम्राट टाईम्स

**लखनौ : उत्तर प्रदेशातील २०२७ विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय समीकरणे झपाट्याने बदलत असताना, रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए) (आरपीआय) ने राज्यात आपली उपस्थिती ठळक करण्यासाठी कंबर कसली आहे. भाजपसोबतच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) मध्ये राहून आरपीआयने उत्तर प्रदेशात २५ जागांची मागणी करत आपली राजकीय ताकद दाखवण्याचा स्पष्ट संदेश दिला आहे.**



दलित आणि मागासवर्गीय मतदारांमध्ये आपली पकड मजबूत करण्याच्या उद्देशाने आरपीआयने आक्रमक भूमिका घेतली असून, 'जय भीम-जय भारत'चा नारा देत राज्याच्या राजकारणात नवी उर्मी निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. मागील काही निवडणुकांमध्ये भाजपला बिनशर्त पाठिंबा देणाऱ्या आरपीआयने यावेळी थेट निवडणुकीच्या रिंगणात उतरून आपले स्वतंत्र अस्तित्व दाखवण्याचा निर्धार केला आहे.

**संविधान दिनी महारॅलीचा बिगुल**

पक्षाची ताकद दाखवण्यासाठी आणि निवडणुकीचे रणशिंग फुंकण्यासाठी आरपीआयने २६ नोव्हेंबर २०२६ रोजी, म्हणजेच संविधान दिनी, लखनौमध्ये भव्य महारॅली आयोजित करण्याची घोषणा केली आहे. या रॅलीत रामदास आठवले स्वतः उपस्थित राहून राज्यभरातील कार्यकर्त्यांना संबोधित करणार आहेत. संविधानाचे संरक्षण, सामाजिक न्याय आणि दलितांच्या हक्कांसाठी लढा हा या महारॅलीचा मुख्य अजेंडा असणार आहे.

राजकीय निरीक्षकांच्या मते, ही महारॅली केवळ शक्तिप्रदर्शन नसून भाजपसमोर आपली ताकद दाखवण्याचा एक रणनीतिक प्रयत्न आहे. जागावाटपाच्या चर्चेत आरपीआयला अधिक महत्त्व मिळावे, यासाठी हा दबाव तंत्राचा भाग मानला जात आहे.

**एनडीएमध्ये जागांसाठी चढाओढ**

उत्तर प्रदेशातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एनडीएतील मित्रपक्षांमध्ये जागांसाठी मोठी चढाओढ सुरू झाली आहे. चिराग पासवान यांच्या नेतृत्वाखालील लोक जनशक्ती पक्ष (रामविलास) तसेच इतर लहान पक्षही मोठ्या प्रमाणात जागांची मागणी करत आहेत. त्यामुळे भाजपसमोर मित्रपक्षांचे समाधान करताना संतुलन साधण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. एनडीएमधील जागावाटप, बसपाच्या मतांवर होणारा परिणाम आणि आरपीआयचा संभाव्य प्रभाव या सर्व बाबी आगामी काळात राज्याच्या राजकारणाला नवे वळण देऊ शकतात. एकूणच, उत्तर प्रदेशच्या राजकीय रणांगणात आरपीआयच्या दमदार एंट्रीमुळे निवडणुकीचे चित्र अधिक रंगतदार होणार आहे. नोव्हेंबरमध्ये होणारी महारॅली आणि त्यानंतरची राजकीय हालचाल यावरच आरपीआयचे भवितव्य आणि राज्यातील समीकरणे मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

### स्वबळावर लढण्याचीही तयारी

आरपीआयने स्पष्ट संकेत दिले आहेत की, सन्मानजनक जागा मिळाल्यास ते भाजपसोबत युती कायम ठेवतील. मात्र, अपेक्षित जागा न मिळाल्यास स्वबळावर अधिक जागा लढवण्याची तयारीही पक्षाने दर्शवली आहे. यामुळे राज्यातील राजकीय समीकरणांमध्ये मोठे बदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. उत्तर प्रदेशातील राजकारणात मायावती यांच्या नेतृत्वाखालील बहुजन समाज पक्ष (बसपा) ही पारंपरिक दलित मतदारांची प्रमुख ताकद राहिली आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत बसपाची पकड काहीशी ढिली होत असल्याचे चित्र दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर आरपीआयने या मतदारांवर लक्ष केंद्रित करत 'जय भीम-जय भारत'चा नारा अधिक जोमाने पुढे आणला आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, लखनौमधील महारॅली हा आरपीआयच्या या व्यापक रणनीतीचा केंद्रबिंदू ठरणार आहे. दलित आणि वंचित समाजाच्या प्रश्नांवर थेट संवाद साधत, आरपीआय राज्यात आपला जनाधार वाढवण्याचा प्रयत्न करणार आहे. रामदास आठवले यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे उत्तर प्रदेशातील निवडणूक अधिक चुरशीची होण्याची चिन्हे आहेत.

---

Selected

## सोने-चांदीच्या दरात मोठी घसरण

**मुंबई :** गुंतवणूकदार आणि दागिन्यांच्या खरेदीदारांसाठी एक मोठी आनंदाची बातमी आहे. गेल्या तीन महिन्यांच्या कालावधीत मौल्यवान धातूंच्या किमतीत ऐतिहासिक घसरण पाहायला मिळाली आहे. जानेवारी २०२६ मध्ये विक्रमी उच्चांक गाठल्यानंतर, आता सोन्याचे दर प्रति १० ग्रॅम ५०,००० रुपयांनी तर चांदी प्रति किलो तब्बल १,९५,००० रुपयांनी घसरली आहे. मल्टि कमोडिटी एक्सचेंज (एमसीएक्स) आणि सराफा बाजारातील आकडेवारीनुसार, २९ जानेवारी २०२६ रोजी सोन्याने २,०२,९८४ रुपये प्रति १० ग्रॅम हा आतापर्यंतचा सर्वोच्च स्तर गाठला होता. मात्र, जागतिक बाजारपेठेतील बदलत्या स्थितीमुळे आज सोन्याचे दर १,५२,००० ते १,५४,००० रुपयांच्या आसपास स्थिरावले आहेत. दुसरीकडे, चांदीमध्ये झालेली घसरण अधिक धक्कादायक आहे. जानेवारीत चांदीचा भाव ४.२५ लाख रुपये प्रति किलो पर्यंत पोहोचला होता. त्यात आता सुमारे १.९५ ते १.९८ लाख रुपयांची घट होऊन ती २.५९ लाख रुपयांवर आली आहे.

---

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

## जळगावमध्ये उष्णतेचा कहर; नशिराबाद येथे 'उष्माघात कक्ष' सज्ज

### ४२°C पार तापमान; आरोग्य विभाग सतर्क



जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद :** जळगाव जिल्ह्यात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या उष्णतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तापमानाने ४० ते ४२ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडल्याने उष्माघाताच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन आरोग्य विभागाने तातडीने उपाययोजना सुरू केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर नशिराबाद येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात (आयुष्मान आरोग्य मंदिर) विशेष 'उष्माघात कक्ष' (HEAT STROKE WARD) कार्यान्वित करण्यात आला आहे.

**तातडीच्या उपचारांसाठी सज्ज यंत्रणा**

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कक्ष सुरू करण्यात आला आहे. उष्माघातग्रस्त रुग्णांना विलंब न होता त्वरित उपचार मिळावेत, यासाठी आरोग्य विभागाने आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

या कक्षामध्ये रुग्णांना आराम मिळावा यासाठी थंड वातावरणाची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच ओआरएस द्रावणासह जीवनावश्यक औषधांचा पुरेसा साठा ठेवण्यात आला आहे. प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचाऱ्यांची २४ तास सेवा उपलब्ध असून, रुग्णांना स्वच्छ व थंड पिण्याच्या पाण्याची सोयही करण्यात आली आहे.

**आरोग्य सेवेला बळकटी**

नशिराबाद परिसरात सुरू करण्यात आलेल्या 'उष्माघात कक्षामुळे' उन्हाळ्यातील आपत्कालीन आरोग्य सेवा अधिक सक्षम झाली असून, स्थानिक नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. आरोग्य विभागाच्या या पुढाकारामुळे उष्णतेच्या वाढत्या लाटेचा सामना करण्यास मदत होणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**डॉक्टरांचे नागरिकांना आवाहन**

वैद्यकीय अधिकारी डॉ. गौरव जाधव आणि डॉ. अजयपाल सिंग यांनी नागरिकांना उष्णतेपासून बचावासाठी योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. दुपारच्या कडक उन्हात अनावश्यक बाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी पिऊन शरीर हायड्रेटेड ठेवावे, तसेच बाहेर जाताना डोक्यावर रुमाल, टोपी किंवा छत्रीचा वापर करावा, असे त्यांनी सांगितले. तसेच चक्कर येणे, मळमळ, तीव्र डोकेदुखी यांसारखी लक्षणे जाणवल्यास तात्काळ नजीकच्या आरोग्य केंद्रात जाऊन उपचार घ्यावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

---

# पाकिस्तानमध्ये महागाईचा 'अॅटम बॉम्ब'!

## गॅस पुरवठा ठप्प आणि इंधन दरात २६.७७ रुपयांची प्रचंड वाढ

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली / इस्लामाबाद |** आपला शेजारील देश पाकिस्तान सध्या अत्यंत गंभीर आर्थिक आणि ऊर्जा संकटाचा सामना करत आहे. एकीकडे देशांतर्गत गॅस पुरवठा पूर्णपणे कोलमडला असतानाच, दुसरीकडे सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत मोठी वाढ करून जनतेचे कंबरडे मोडले आहे. या दुहेरी संकटामुळे पाकिस्तानात सध्या हाहाकार माजला आहे.

**गॅस पुरवठा ठप्प; महागड्या**

पाकिस्तान सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत २६.७७ रुपयांची मोठी वाढ केली आहे. या दरवाढीनंतर देशातील इंधनाचे दर आता नव्या उच्चांकावर पोहोचले आहेत. इंधन महागल्यामुळे वाहतूक खर्च वाढणार असून, त्याचा थेट परिणाम भाजीपाला, दूध आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर होणार आहे. यामुळे आधीच महागाईने होरपळणाऱ्या जनतेवर मोठा भार पडला आहे.



**'एलएनजी'वर अवलंबित्व**

देशांतर्गत गॅसच्या उत्पादनात झालेली घट आणि पायाभूत सुविधांचा अभाव यामुळे पाकिस्तानातील गॅस पुरवठा विस्कळीत झाला आहे. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पाकिस्तान सरकारला आता आंतरराष्ट्रीय बाजारातून चढ्या दराने लिक्विफाइड नॅचरल गॅस (एलएनजी) खरेदी करणे भाग पडत आहे.

**इराण युद्धाचे सावट**

मध्यपूर्वेतील, विशेषतः इराणशी संबंधित वाढत्या तणावामुळे जागतिक ऊर्जा बाजारात अस्थिरता आहे. अशा स्थितीत महागड्या दराने गॅस खरेदी केल्यामुळे पाकिस्तानच्या परकीय चलन साठ्यावर प्रचंड ताण येत आहे. एकीकडे इस्लामाबादमध्ये याच युद्धात तोडगा काढण्यासाठी शांतता चर्चेचे आयोजन होत असताना यजमान पाकिस्तानात मात्र महागाईचा आगडोंब उसळला आहे.

**आर्थिक संकटाची प्रमुख कारणे**

* परकीय चलनाची टंचाई: महागड्या इंधन आणि गॅस आयातीसाठी आवश्यक असलेले डॉलर पाकिस्तानकडे कमी आहेत.
* प्रादेशिक तणाव: इराणमधील युद्धजन्य परिस्थितीमुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून किमती गगनाला भिडल्या आहेत.
* सरकारी धोरणे: कर्जाचा हप्ता फेडण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या (आयएमएफ) अटी पूर्ण करण्यासाठी सरकारला सातत्याने दरवाढ करावी लागत आहे.

---

## बटर गार्लिक नान' जगातील नंबर-१ ब्रेड!

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली |** भारतीय खाद्यसंस्कृतीचा सुगंध आता केवळ गल्लीबोळापुरता मर्यादित राहिला नसून, तो सातसमुद्रापार पोहोचला आहे. आपल्याकडील लज्जतदार मसाल्यांनी आणि अनोख्या चवींनी आता अवघ्या जगाला वेड लावले आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'जागतिक खाद्य क्रमवारीत' भारतीय पाककलेने मानाचे १३ वे स्थान पटकावले आहे. पण खरी आनंदाची बातमी पुढेच आहे – आपली लाडकी 'बटर गार्लिक नान' हा जगातील नंबर-१ ब्रेड ठरला आहे!

अस्सल 'बटर चिकन'ची चव असो किंवा तव्यावरून उतरलेली, तोंडात टाकताच विरघळणारी गरमागरम 'बटर गार्लिक नान'; परदेशी पाहुणे आता भारतीय चवीच्या प्रेमात पूर्णपणे बुडाले आहेत. जागतिक स्तरावर विविध देशांच्या खाद्यपदार्थांचे सर्वेक्षण करण्यात आले, ज्यामध्ये भारतीय पदार्थांमधील विविधता, मसाल्यांचा संतुलित वापर आणि बनवण्याची पारंपारिक पद्धत याला विशेष पसंती मिळाली आहे. जगभरातील शेकडो प्रकारच्या ब्रेड्सना मागे टाकत भारताच्या 'बटर गार्लिक नान'ने अव्वल स्थान पटकावले आहे.

**'बटर गार्लिक नान'ला का पसंती?**

त्याचा मऊपणा, लसणाचा खमंग स्वाद आणि वरून लावलेले साजूक लोणी या त्रिकुटाने विदेशी परीक्षकांना भुरळ घातली. या यादीत भारताच्या इतरही काही पदार्थांनी पहिल्या ५० मध्ये स्थान मिळवून आपली पकड घट्ट केली आहे. जागतिक क्रमवारीत १३ व्या क्रमांकावर पोहोचणे ही भारतीय शेफ्स आणि घराघरात राबणाऱ्या सुगृहिणींसाठी अभिमानाची गोष्ट आहे. इटालियन, चायनीज आणि फ्रेंच डिशेसच्या स्पर्धेत भारतीय 'करी' आणि 'तंदूरी' पदार्थांनी स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे.

---

## भाजपने केजरीवालांना म्हटले 'दिल्लीचे रहेमान डकैत'!

### पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांना हवाय राष्ट्रपतींचा हस्तक्षेप

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली/चंदीगड :** आम आदमी पार्टीतील अंतर्गत बंडाळी आणि भाजपचा वाढता हल्लाबोल यामुळे दिल्ली ते पंजाबपर्यंतचे राजकारण कमालीचे तापले आहे. राघव चड्ढा यांच्या भाजप प्रवेशानंतर भाजपने अरविंद केजरीवालांवर वैयक्तिक टीका करताना सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत, तर दुसरीकडे आपल्या खासदारांना माघारी बोलावण्यासाठी मुख्यमंत्री भगवंत मान यांनी थेट राष्ट्रपतींच्या हस्तक्षेपाची विनंती केली आहे.

राघव चड्ढा यांनी 'आप'ची साथ सोडल्यानंतर भाजपने अरविंद केजरीवालांविरुद्ध आक्रमक पवित्रा घेतला आहे. भाजपने अधिकृतपणे केजरीवालांचा उल्लेख 'दिल्लीचे रहेमान डकैत' असा केला आहे. जनतेच्या पैशांची लूट करून स्वतःसाठी आलिशान महाल बांधल्याचा आरोप करत भाजपने हा प्रहार केला आहे.



**'शीशमहाल २' चे प्रदर्शन**

भाजपने सोशल मीडियावर काही फोटो प्रसिद्ध केले आहेत, ज्याला 'शीशमहाल भाग २' असे म्हटले जात आहे. लोधी इस्टेटमधील एका आलिशान बंगल्यातील सुखसोयींचे हे फोटो असून, केजरीवालांचे 'आम आदमी' असणे हे केवळ एक ढोंग असल्याचे भाजपने म्हटले आहे.

**भगवंत मान राष्ट्रपतींच्या भेटीला**

पंजाबमधील आम आदमी पार्टीच्या ७ राज्यसभा खासदारांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने पंजाब सरकार हादरले आहे. यावर उपाय म्हणून मुख्यमंत्री भगवंत मान यांनी आता घटनात्मक लढाई सुरू केली आहे. मुख्यमंत्री मान यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची वेळ मागितली असून, या ७ खासदारांना पदावरून 'रिकॉल' (परत बोलावणे) करण्यासाठी केंद्र सरकारने हस्तक्षेप करावा, अशी मागणी ते करणार आहेत. "जनतेने ज्यांना विश्वासाने निवडून दिले, त्यांनी पक्षांतर करणे हा लोकशाहीचा अपमान आहे," अशी भूमिका मान यांनी घेतली आहे. त्यांच्यासोबत पंजाबमधील अनेक आमदारही राष्ट्रपती भवनात उपस्थित राहण्याची शक्यता आहे.

**राघव चड्ढांचा 'आप'वर पलटवार**

पक्षांतर केल्यानंतर राघव चड्ढा यांनी मौन सोडले आहे. 'शीशमहाल' प्रकरणावरून त्यांनी 'आप'वर टीका करताना म्हटले की, पक्षाच्या प्रतिमेला झालेल्या नुकसानीमुळेच निवडणुकांमध्ये पराभव पत्करावा लागला. त्यांनी 'शीशमहाल २' च्या पुराव्यांकडे लक्ष वेधत पक्षातील अंतर्गत कारभारावर नाराजी व्यक्त केली.

**'आप'कडून 'फेक न्यूज'चा दावा**

भाजपच्या आरोपांना उत्तर देताना 'आप'ने आक्रमक पवित्रा घेतला आहे. भाजपने प्रसिद्ध केलेले 'शीशमहाल २' चे फोटो बनावट असून ते इंटरनेटवरून (पिनट्रेस्ट) चोरी केलेले असल्याचा दावा 'आप'ने केला आहे.

---

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज | ज

## मुकुंद भाऊ सपकाळे यांच्यावर हल्ला; शिवसेना शिंदे गट आक्रमक

### आरोपींना तात्काळ अटक करून 'मोका' अंतर्गत कारवाईची मागणी; पोलीस प्रशासनाला निवेदन

जन सम्राट टाईम्स

**जळगाव : जळगाव शहरात ११ एप्रिल रोजी घडलेल्या मुकुंद भाऊ सपकाळे यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याच्या घटनेने शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती, जळगाव शहरचे अध्यक्ष असलेल्या सपकाळे यांच्यावर झालेल्या या हल्ल्याची गंभीर दखल शिवसेना शिंदे गटाने घेतली असून, आरोपींविरोधात कठोर कारवाईची मागणी आक्रमकपणे पुढे आली आहे.**



या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाचे प्रवक्ते किरण सोनावणे यांनी अतिरिक्त पोलीस अधीक्षक संदीप गावित यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी संबंधित प्रकरणाचा सविस्तर आढावा घेत आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी केली. तसेच, हा हल्ला केवळ वैयक्तिक वाद नसून यामागे काही मोठा कट असण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे नमूद करत संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. यावेळी पोलीस प्रशासनाला देण्यात आलेल्या निवेदनात आरोपींवर 'मोका' (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा) अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली. गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मोका अंतर्गत कारवाई प्रभावी ठरते, त्यामुळे या प्रकरणातही तीच भूमिका घ्यावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदन सादरीकरणावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा सचिव प्रा. प्रीतीलाल पवार तसेच राष्ट्रीय भीमसेनेचे जिल्हाध्यक्ष वाल्मिक जाधव उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध करत, दोषींना कठोर शिक्षा होणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. तसेच, समाजात दहशत निर्माण करणाऱ्या अशा प्रवृत्तीला वेळीच आळा घालणे गरजेचे असल्याचेही मत व्यक्त करण्यात आले. दरम्यान, या घटनेनंतर शहरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून विविध सामाजिक आणि राजकीय स्तरावरूनही निषेध व्यक्त होत आहे. सपकाळे यांच्यावर झालेल्या हल्ल्यामुळे त्यांच्या समर्थकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली असून, न्याय मिळेपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला जात आहे.

### नागरिकांनीही सतर्क राहण्याचे आवाहन

पोलीस प्रशासनाकडून या प्रकरणाचा तपास वेगाने सुरू असल्याची माहिती मिळत असून, लवकरच आरोपींना अटक करून कायदेशीर कारवाई केली जाईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या घटनेमुळे जळगावमध्ये कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्याची गरज अधोरेखित झाली असून, नागरिकांनीही सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

---

## भाजपच्या संघटन रचनेत ऐतिहासिक बदल; नितीन नवीन यांच्या टीममध्ये ३३% महिलांना संधी

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली :** भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी आपल्या नवीन कार्यसमितीची घोषणा करताना 'नारी शक्ती'ला झुकते माप दिले आहे. पक्षाच्या केंद्रीय संघटनेत आता ३३ टक्के महिलांना स्थान देण्याचा महत्त्वपूर्ण 'फॉर्म्युला' लागू करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, हे आरक्षण केवळ नावापुरते नसून पक्षाच्या सर्वोच्च निर्णय घेणाऱ्या 'संसदीय बोर्ड'पासून ते 'सचिव' स्तरापर्यंत सर्वत्र लागू असेल.

नितीन नवीन यांच्या नवीन टीममध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण करताना महिलांच्या सहभागावर विशेष भर देण्यात आला आहे. संसदीय बोर्ड या पक्षाच्या सर्वात शक्तिशाली मंडळांत आता ३३% महिला सदस्यांचा समावेश असेल. राष्ट्रीय स्तरावरील सचिव आणि सह-सचिव पदांवरही याच प्रमाणात महिलांची



नियुक्ती केली जाणार आहे. भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीमध्ये यावेळी १०० हून अधिक महिलांना स्थान देण्यात आले आहे, जो आतापर्यंतचा एक विक्रम मानला जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आणलेल्या 'नारी शक्ती वंदन अधिनियमा'ची अंमलबजावणी पक्षाच्या अंतर्गत स्तरावर सुरू झाल्याचे हे संकेत आहेत. नितीन नवीन यांनी स्पष्ट केले की, केवळ निवडणुकांमध्ये आरक्षण देणे पुरेसे नसून पक्षाच्या धोरणात्मक निर्णयांमध्येही महिलांचे नेतृत्व असणे काळाची गरज आहे.

» Selected

### तथागत वेल्फेअर फाउंडेशनच्या वतीने भीमगीतांचा कार्यक्रम

**मुंबई:** क्रांतिसूर्य महात्मा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त च-होली परिसरातील पुष्प चौथे येथे काल भव्य भीमगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रसिद्ध गायिका आई कडूबाई खरात यांनी आपल्या सुमधुर आवाजात सादर केलेल्या भीमगीतांनी उपस्थितांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमास मा. महापौर तसेच विद्यमान नगरसेवक नितीन अप्पा काळजे, नगरसेवक सचिन भाऊ तापकीर, नगरसेविका सारिका ताई गायकवाड, रिपब्लिकन सेना महिला आघाडी पुणे अध्यक्षा सौ. गौरी ताई शेलार, नगरसेवक सागर भाऊ गवळी, सामाजिक कार्यकर्ते महेश भाऊ तापकीर, विनोद गायकवाड, तसेच वंचित बहुजन आघाडीचे युवा अध्यक्ष सोनू भाऊ शेळके यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते विजय मुंडे, तथागत वेल्फेअर फाउंडेशनचे अध्यक्ष रंगनाथ वाघमारे, उपाध्यक्ष राजेंद्र ढगे, खजिनदार सदानंद उदागे, सचिव राजू इंगळे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीचे अध्यक्ष धनराज मनोहर, खजिनदार समाधान ओव्हाळ, सचिव सचिन कांबळे आणि इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तथागत वेल्फेअर फाउंडेशन आणि उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# नीती आयोग देशाच्या धोरण-निर्मितीचा आधारस्तंभ! : पंतप्रधान नरेंद्र मोदी

## पुनर्रचनेत अशोक कुमार लाहिरी उपाध्यक्ष; नव्या सदस्यांचीही नियुक्ती

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली :** नरेंद्र मोदी यांनी शनिवारी सोशल मीडिया पोस्टद्वारे नीती आयोग देशाच्या धोरण-निर्मिती व्यवस्थेतील एक महत्त्वाचा आधारस्तंभ असल्याचे म्हटले आहे. त्यांनी नमूद केले की, नीती आयोग सहकारी संघराज्यवादाला चालना देतो, विविध सुधारणांना गती देतो आणि नागरिकांचे जीवन अधिक सुलभ करण्यासाठी प्रभावी भूमिका बजावतो.

पंतप्रधानांनी पुढे सांगितले की, नीती आयोग हा विविध क्षेत्रांमध्ये नवोन्मेष आणि दीर्घकालीन धोरणात्मक विचारांना चालना देणारा एक गतिमान मंच बनला आहे. केंद्र आणि राज्य सरकारांमधील समन्वय साधत विकासाच्या प्रक्रियेला वेग



देण्यात आयोगाची भूमिका महत्त्वाची ठरत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

**पुनर्रचनेत मोठे बदल**

दरम्यान, केंद्र सरकारने नीती आयोगाची पुनर्रचना जाहीर केली असून अशोक कुमार लाहिरी यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ते विद्यमान उपाध्यक्ष सुमन के. बेरी यांची जागा घेणार आहेत. अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरण क्षेत्रातील लाहिरी यांचा दीर्घ अनुभव आयोगाच्या कामकाजाला नवे बळ देईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यासोबतच, राजीव गौबा, के. व्ही. राजू, गोवर्धन दास, एम. श्रीनिवास आणि अभय करंदीकर यांची नीती आयोगाचे पूर्णवेळ सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### अशोक कुमार लाहिरींची नीती आयोगाच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती


नरेंद्र मोदी यांनी नीती आयोगाच्या उपाध्यक्षपदी नियुक्त झालेल्या अशोक कुमार लाहिरी यांच्याबद्दल विश्वास व्यक्त करत त्यांच्या अनुभवाचे कौतुक केले आहे. "अर्थशास्त्र आणि सार्वजनिक धोरणातील त्यांचा समृद्ध अनुभव भारतातील सुधारणांचा मार्ग आणि 'विकसित भारत' बनण्याच्या प्रवासाला अधिक बळकट करेल. मला खात्री आहे की त्यांच्या प्रयत्नांमुळे देशाची धोरणनिर्मिती आणखी गतिमान होईल," असे पंतप्रधानांनी नमूद केले. तसेच लाहिरी यांच्या यशस्वी कार्यकाळासाठी त्यांनी शुभेच्छाही दिल्या.

**पंतप्रधानांची भेट व शुभेच्छा**

नवनियुक्त उपाध्यक्ष अशोक कुमार लाहिरी यांनी नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान पंतप्रधानांनी त्यांचे अभिनंदन करत, त्यांच्या अनुभवाचा देशाच्या विकास प्रक्रियेत महत्त्वपूर्ण उपयोग होईल, असा विश्वास व्यक्त केला. मोदी म्हणाले की, लाहिरी यांचा अर्थशास्त्र व सार्वजनिक धोरणातील सखोल अनुभव भारताला विकसित राष्ट्र बनविण्याच्या दिशेने होणाऱ्या प्रयत्नांना गती देईल. त्यांच्या नेतृत्वाखाली धोरणनिर्मिती प्रक्रियेत नवी ऊर्जा आणि नवोन्मेष येईल, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

# नवजात बालकांसाठी जगातील पहिल्या विशेष औषधाला 'हू'ची मंजुरी

**जिनिव्हा/बासेल :** जागतिक आरोग्य संघटना (हू-डब्ल्यूएचओ) ने 'कोआर्टेम बेबी' या औषधाला 'प्री-क्वालिफिकेशन' बहाल केले आहे. २ ते ५ किलोग्रॅम वजनाच्या नवजात बालकांसाठी विकसित केलेले हे जगातील पहिले आणि एकमेव मलेरिया प्रतिबंधक औषध ठरले आहे. या निर्णयामुळे आता जगभरातील सरकारी यंत्रणांना या औषधाची खरेदी आणि वितरण करणे सोपे होणार आहे.



हे औषध विशेषतः अतिशय लहान मुलांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आले आहे. कोआर्टेम बेबी असे नव्या मलेरिया प्रतिबंधक औषधाचे नाव आहे. 'आर्टेमेदर-ल्युमेफँट्रिन' चे हे नवीन स्वरूप आहे. आर्टेमेदर रक्तातील मलेरियाच्या परजीवींचा (Parasites) त्वरित नायनाट करते, तर ल्युमेफँट्रिन दीर्घकाळ शरीरात राहून उरलेले परजीवी नष्ट करते, ज्यामुळे आजार पुन्हा उलटण्याची शक्यता कमी होते.

२ ते ५ किलो वजन असलेल्या नवजात शिशूंसाठी हे उपयुक्त ठरणार आहे. हे औषध वापरासही सोपे आहे. हे औषध पाण्यात किंवा आईच्या दुधात सहज विरघळणारे (डिस्पर्सिबल) असून त्याला चेरी फ्लेवर देण्यात आला आहे. पूर्वी लहान मुलांसाठी वेगळे औषध नसल्यामुळे मोठ्यांच्या गोळ्यांचे तुकडे करून दिले जात. ही गोळी थोड्याशा पाण्यात किंवा आईच्या दुधात टाकली की ती काही सेकंदात विरघळते. यामुळे लहान मुलांना औषध गिळण्याचा त्रास होत नाही.

नोव्हार्टिस आणि 'मेडिसिन्स फॉर मलेरिया व्हेंचर' (एमएमव्ही) यांच्या सहकार्यातून हे औषध विकसित करण्यात आले आहे. हे औषध सहसा अन्नासोबत किंवा दुध पाजल्यानंतर देण्याचा सल्ला दिला जातो. औषधातील 'ल्युमेफँट्रिन' हा घटक चरबीयुक्त अन्नासोबत शरीरात अधिक चांगल्या प्रकारे शोषला जातो. जरी मुलाला एका दिवसानंतर बरे वाटू लागले, तरी डॉक्टरांनी सांगितलेला औषधाचा पूर्ण कोर्स (सहसा ३ दिवस) पूर्ण करणे अनिवार्य आहे.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# अयोध्येतील राम मंदिरात 'एसी' वेटिंग रूम आणि खास सुविधा

## वाढत्या उष्णतेपासून रामभक्तांना मोठा दिलासा

। जन सम्राट टाईम्स ।

**अयोध्या :** अयोध्येत सध्या उन्हाचा पारा वाढत असून, प्रभू श्रीरामाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना या भीषण उष्णतेचा त्रास होऊ नये यासाठी 'श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्ट'ने जय्यत तयारी केली आहे. भाविकांच्या सुखद दर्शनासाठी मंदिरात करण्यात आलेल्या विशेष सुविधा देण्यात आल्या आहेत. वातानुकूलित प्रतिक्षालये आणि विश्रामगृहेही सुरू करण्यात आली आहेत.

रामललाच्या दर्शनासाठी देशभरातून येणाऱ्या लाखो भाविकांना वाढत्या तापमानाचा फटका बसू नये, यासाठी मंदिर प्रशासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. भाविकांच्या सुविधेसाठी मंदिरात आता वातानुकूलित (एसी) वेटिंग रूम कार्यान्वित करण्यात आले आहेत. दर्शनासाठी रांगेत उभे राहणाऱ्या भाविकांना उष्णतेपासून वाचवण्यासाठी मंदिर परिसरात ठिकठिकाणी या एसी वेटिंग रूम्स तयार करण्यात आल्या आहेत. यामुळे वयोवृद्ध आणि लहान मुलांचा प्रवास सुखकर होणार आहे.

इथे आरामदायी आसनव्यवस्था करण्यात आली आहे. सर्वच वेटिंग रूममध्ये भाविकांना बसण्यासाठी सोफे आणि आरामदायी खुर्च्यांची व्यवस्था करण्यात आली आहे, जेणेकरून थकलेल्या भाविकांना विश्रांती घेता येईल. उष्णतेमुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी



होऊ नये, यासाठी ठिकठिकाणी आरओ फिल्टरचे थंड पाणी उपलब्ध करून दिले आहे. भाविकांच्या पायांच्या संरक्षणासाठी ज्यूट कार्पेट अंथरण्यात आले आहेत. मंदिर परिसरात अनवाणी चालणाऱ्या भाविकांचे पाय जळू नयेत म्हणून संपूर्ण मार्गावर ज्यूटचे जाड कार्पेट टाकण्यात आले असून त्यावर सातत्याने पाण्याचा फवारा मारला जात आहे.

**सावलीसाठी शेड**

.दर्शनासाठीच्या रांगेत भाविकांना थेट उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून छताची व्याप्ती वाढवण्यात आली आहे. ओआरएस आणि औषधे डिहायड्रेशनचा त्रास झाल्यास भाविकांसाठी ओआरएसची पाकिटे आणि प्रथमोपचाराची व्यवस्थाही उपलब्ध आहे. उन्हाळ्यात भाविकांची संख्या कमी होऊ नये आणि जे भक्त दर्शनासाठी येत आहेत त्यांना कोणतीही शारीरिक अडचण येऊ नये, याला आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे, असे ट्रस्टने म्हटले आहे. वाढत्या उष्म्याचा विचार करता मंदिर प्रशासनाने केलेल्या या हायटेक आणि संवेदनशील सुविधांमुळे भाविकांकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# जळगावात धडाकेबाज 'नाकाबंदी मोहीम'; २१००+ वाहनांची तपासणी

## ३७४ केसेस नोंद; २.३८ लाखांचा दंड वसूल



जन सम्राट टाईम्स

**जळगाव :** जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि वाहतूक नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी जळगाव जिल्हा पोलीस दलाने २४ एप्रिल २०२६ रोजी संपूर्ण जिल्ह्यात विशेष 'नाकाबंदी मोहीम' राबवून व्यापक कारवाई केली. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सायंकाळी ६ ते रात्री १०.३० या वेळेत ही मोहीम प्रभावीपणे पार पडली.

**कडक बंदोबस्त, सर्वत्र तपासणी**

या मोहिमेसाठी जिल्ह्यातील ५९ महत्त्वाच्या ठिकाणी नाकाबंदी पॉइंट्स उभारण्यात आले होते. एकूण ४८ पोलीस अधिकारी आणि २१६ पोलीस अंमलदार तैनात करून प्रमुख मार्गांवर कडक तपासणी करण्यात आली. संशयित हालचालींवर लक्ष ठेवत प्रत्येक वाहनाची सखोल तपासणी करण्यात आली.

**वाहतूक नियमभंगावर कडक कारवाई**

नाकाबंदी दरम्यान सुमारे २१०० ते २२०० वाहनांची तपासणी करण्यात आली. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरोधात मोटार वाहन कायद्यांतर्गत ३७४ केसेस नोंदवण्यात आल्या. विविध उल्लंघनांबद्दल एकूण २,३८,६५० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

याशिवाय मद्यप्राशन करून वाहन चालवणाऱ्या ५ चालकांवर गुन्हे दाखल करण्यात आले, ज्यामुळे वाहतूक सुरक्षिततेबाबत पोलिसांची कडक भूमिका स्पष्ट झाली आहे.

**सार्वजनिक उपद्रवांवरही आळा**

पोलीस प्रशासनाने केवळ वाहतूक नियमभंगावरच नव्हे, तर सार्वजनिक ठिकाणी उपद्रव करणाऱ्यांवरही कठोर कारवाई केली. टवाळखोरी करणाऱ्या ४६ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली, तर उघड्यावर मद्यप्राशन करणाऱ्या १३ जणांविरोधात १५ केसेस नोंदवण्यात आल्या.

**जिल्हाभरात व्यापक अंमलबजावणी**

ही मोहीम जळगाव शहरातील एमआयडीसी, शनिपेठ, जिल्हापेठ, रामानंद नगर तसेच भुसावळ, रावेर, चोपडा, चाळीसगाव आणि पाचोरा या भागांत मोठ्या प्रमाणावर राबविण्यात आली. यामुळे संपूर्ण जिल्ह्यात पोलिसांची उपस्थिती जाणवली आणि कायदा सुव्यवस्थेचा धाक निर्माण झाला.

# जळगावात अवैध वाळू वाहतुकीवर पोलिसांची धडक कारवाई

## २५.५० लाखांची वाहने जप्त; ४३ हजारांची वाळू हस्तगत, जिल्हाभरात एकाच वेळी मोहीम

जन सम्राट टाईम्स

**जळगाव :** जळगाव जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीविरोधात जिल्हा पोलीस दलाने व्यापक आणि नियोजित संयुक्त कारवाई करत बेकायदेशीर धंद्यांवर लगाम घालण्याचा प्रयत्न केला आहे. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या थेट मार्गदर्शनाखाली २४ एप्रिल २०२६ रोजी रात्री ८ वाजेपासून ते २५ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजेपर्यंत जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकाच वेळी ही धडक मोहीम राबविण्यात आली.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांवर विशेष लक्ष केंद्रित केले. तपासणीदरम्यान एकूण ४ वाहने जप्त



करण्यात आली असून, त्यामध्ये ट्रॅक्टर आणि डंपरचा समावेश आहे. जप्त करण्यात आलेल्या वाहनांची एकूण किंमत सुमारे २५ लाख ५० हजार रुपये इतकी असून, संबंधित वाहनांमधून सुमारे ४३ हजार रुपयांची अवैध वाळूही हस्तगत करण्यात आली आहे.

ही कारवाई भडगाव, चोपडा ग्रामीण, चाळीसगाव ग्रामीण आणि यावल या पोलीस ठाण्यांच्या हद्दीत प्रभावीपणे पार पडली. या भागांमध्ये अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीच्या तक्रारी सातत्याने येत असल्याने पोलिसांनी एकाच वेळी विविध ठिकाणी सापळा रचत ही मोहीम यशस्वी केली.

सदर प्रकरणात संबंधित वाहनचालकांविरोधात बी.एन.एस. २०२३ च्या कलम ३०३(२) तसेच मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १३०(१) व १७७ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामुळे कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा संदेश दिला गेला आहे. या धडक कारवाईदरम्यान पोलीस अधिकारी कविता नेरकर आणि संदीप गावित यांच्या मार्गदर्शनाखाली पथकांनी समन्वय साधत प्रभावी कामगिरी बजावली. रात्रीच्या वेळीही सतर्क राहून पोलिसांनी विविध ठिकाणी नाकाबंदी करत संशयित वाहनांची तपासणी केली.

### कारवाई सुरूच राहणार


जिल्ह्यातील खनिज संपत्तीची चोरी रोखण्यासाठी आणि अवैध वाळू माफियांवर अंकुश ठेवण्यासाठी अशा प्रकारच्या धडक कारवाया पुढेही सातत्याने राबविण्यात येणार असल्याचा इशारा पोलीस प्रशासनाने दिला आहे. या कारवाईमुळे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, कायदा मोडणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार असल्याचा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे.

# निगडी–रावेत BRT स्थानकात धोकादायक स्थिती; अपघाताचा धोका वाढला

## रस्त्यावर पडलेले व तोबकळणारे पोल; नागरिकांचा संताप, प्रशासनाकडे तातडीच्या कारवाईची मागणी

जन सम्राट टाईम्स

**पिंपरी-चिंचवड :** निगडी–रावेत येथील BRT बस स्थानक परिसरात गंभीर निष्काळजीपणाचा प्रकार समोर आला असून प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. भक्ती शक्ती उद्यान पाठीमागील बस स्थानकाजवळ रस्त्यावर लोखंडी पोल पडलेल्या अवस्थेत आहे, तर दुसऱ्या ठिकाणी पोल धोकादायकरीत्या तोबकळत असल्याने मोठ्या अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे.



विशेषतः बसमध्ये चढ-उतार करण्याच्या ठिकाणीच ही धोकादायक परिस्थिती असल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. रोज हजारो नागरिक या मार्गाचा वापर करत असल्याने तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

या संदर्भात PMPML च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे ईमेलद्वारे तक्रार दाखल करण्यात आली आहे. तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तांनाही या प्रकाराची माहिती देत संबंधित ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. ही तक्रार भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी नोंदवली असून,"

# आगापे इन्स्टिट्यूट पुणेचा पदवीदान सोहळा उत्साहात

## २४ विद्यार्थ्यांना ईश्वरविज्ञान पदवी प्रदान; ८४ वर्षीय रजनी साळवे यांचे विशेष कौतुक



जन सम्राट टाईम्स

**पुणे |** पुणे येथील आगापे इन्स्टिट्यूट तर्फे आयोजित पदवीदान सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यात ईश्वरविज्ञान (THEOLOGY) अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या २४ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. कॅम्प परिसरात झालेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक आणि मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

या प्रसंगी प्रिन्सिपॉल जोमन मॅथ्यूज आणि डॉ. डब्ल्यू. एस. ॲनी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पास्टर रॉबिन महाडकर, पास्टर अनिल गडकरी, पास्टर राजेश केळकर आणि बिशप प्रदीप वाघमारे उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत, शिक्षणाचा उपयोग समाजसेवेसाठी करावा, असा संदेश दिला. या सोहळ्यात जॉइल्स त्रिभुवन, संगीता आरसूड, अंजना गुरव आणि मारिया देठे यांना गुणवत्तेसाठी विशेष सन्मानित करण्यात आले. त्यांच्या यशाचे कौतुक करत इतर विद्यार्थ्यांनीही त्यांच्याकडून प्रेरणा घ्यावी, असे मत व्यक्त करण्यात आले.

विशेष म्हणजे, ८४ वर्षीय रजनी साळवे यांनी हा अभ्यासक्रम पूर्ण करून उपस्थितांसमोर जिद्द आणि चिकाटीचे प्रेरणादायी उदाहरण ठेवले. वय हा केवळ आकडा असून शिक्षणाची ओढ आणि मेहनत असेल तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही, हे त्यांनी सिद्ध केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पास्टर राजेश केळकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन रजनी साळवे यांनी मानले. संपूर्ण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# कानळदा सोसायटीच्या चेअरमन-व्हाईस चेअरमनचा नागरी सत्कार

## योगेश चव्हाण व दिनकर भंगाळे बिनविरोध निवड; ग्रामपंचायतीकडून उत्स्फूर्त गौरव

जन सम्राट टाईम्स

**जळगाव :** जळगाव तालुक्यातील कानळदा पीक संरक्षण सोसायटीच्या चेअरमन व व्हाईस चेअरमन पदाची निवडणूक २४ एप्रिल रोजी बिनविरोध पार पडत स्थानिक पातळीवर एकमताचे उदाहरण पाहायला मिळाले. या निवडणुकीत चेअरमनपदी योगेश पंडितराव चव्हाण तर व्हाईस चेअरमनपदी दिनकर चावदस भंगाळे यांची निवड करण्यात आली.

या निवडीच्या निमित्ताने २५ एप्रिल (शनिवार) रोजी ग्रामपंचायत



कानळदा पदाधिकाऱ्यांच्या वतीने नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा नागरी सत्कार आयोजित करण्यात आला. गावकऱ्यांनी मोठ्या उत्साहात उपस्थित राहत नवनियुक्त नेतृत्वाचे स्वागत करत शुभेच्छांचा वर्षाव केला.,कार्यक्रमास सरपंच पुंडलिक बापूसाहेब सपकाळे, जळगाव तालुका कापूस उत्पादक सोसायटीच्या चेअरमन सरला चंद्रकांत चव्हाण, कानळदा विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमन मनीषा मनोज राणे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच ग्रामपंचायत सदस्य जगदीश सपकाळे, भिकन सपकाळे, निवृत्ती बोरोले, अशोक धनगर, नामदेव बिराडे, किसन सपकाळे, योगेश भंगाळे, मनोज राणे, नामदेव धनगर, कांतीलाल सपकाळे, नवल मोरे आणि गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात जगदीश सपकाळे यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी सोसायटीच्या कार्याचा आढावा घेत नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांकडून गावाच्या प्रगतीसाठी सकारात्मक योगदानाची अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी चेअरमन योगेश चव्हाण आणि व्हाईस चेअरमन दिनकर भंगाळे यांनी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या हितासाठी कार्य करत सोसायटीच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभ अधिकाधिक सदस्यांपर्यंत पोहोचवण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

या नागरी सत्कार सोहळ्यामुळे गावात एकात्मतेचे वातावरण निर्माण झाले असून, नवनिर्वाचित नेतृत्वाकडून विकासाची गती अधिक वेगाने वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.